# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१**

**दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २२६९२१०२**

**तार -EDUTECH E-mail :- desk1@dtemaharashtra.gov.in internet :- http://www.dtemaharashtra.gov.in**


**<u>तातडीचे/कालमर्यादित</u>**

क्र . १/तंशिसं/सहसंचालक/प्रतिनियुक्ती-तदर्थ नियुक्ती/२०१५/३८

दिनांक : 07/08/2015

परिपत्रक :

विषय : महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशासकीय सेवा या संवर्गातील रिक्त पदांवर तदर्थ व्यवस्थेने ०२ वर्षाचे कमाल कालावधीसाठी प्रतिनियुक्ती/बदली करण्याबाबत.

तंत्रशिक्षण संचालनालय, मुख्य कार्यालय, मुंबई/तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये/महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ कार्यालये यामध्ये उपसंचालक, सहाय्यक संचालक, उपसचिव या पदानामाची प्रशासकीय संवर्गातील पदे रिक्त असून त्याचा तपशिल खाली नमूद करण्यात येत आहे. सदर कार्यालयांमधील कामाची व्याप्ती व निकड विचारात घेता सदर रिक्त पदांवर नियमित नियुक्त्या होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त ०२ वर्षाच्या कालावधीपर्यंत (जे आधी घडेल तोपर्यंत) दि.२१/११/१९९३ व ९/९/२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन तदर्थ व्यवस्थेने संवर्गबाहय पदावर प्रतिनियुक्ती किंवा बदली करण्याचे प्रायोजिले आहे.

प्रशासकीय संवर्गातील पदाची वेतनश्रेणी ही शिक्षकीय पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा निम्न असल्याने शिक्षकीय पदाची वेतनश्रेणी मर्यादित कालावधीसाठी संरक्षित करुन पदस्थापना करण्यासाठी इच्छापत्रे मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | | पदनाम | अंदाजित रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १. | तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य | मुख्य कार्यालय | उपसंचालक | ०३ |
| | | विभा.कार्या.,मुंबई | सहाय्यक संचालक (तां.) | ०२ |
| | | विभा.कार्या.,पुणे | सहाय्यक संचालक (तां.) | ०१ |
| | | विभा.कार्या.,नाशिक | सहाय्यक संचालक (तां.) | ०१ |
| | | विभा.कार्या.,अमरावती | सहाय्यक संचालक (तां.) | ०१ |
| | | विभा.कार्या.,नागपूर | सहाय्यक संचालक (तां.) | ०१ |
| २. | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ | मुख्य कार्यालय | उप सचिव (तां.) | ०७ |
| | | | सहा. सचिव (तां.) | ११ |
| | | विभा.कार्या.,मुंबई | उप सचिव/सहा.सचिव (तां.) | ०१/०१ |
| | | विभा.कार्या.,पुणे | उप सचिव/सहा.सचिव (तां.) | ०१/०१ |
| | | विभा.कार्या.,नागपूर | उप सचिव/सहा.सचिव (तां.) | ०१/०१ |
| | | विभा.कार्या.,औरंगाबाद | उप सचिव/सहा.सचिव (तां.) | ०१/०१ |

उपरोक्त रिक्त पदे अंदाजित असून पदे भरण्याची निकड विचारात घेऊन पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे.

**उपसंचालक** या पदावर महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा या संवर्गातील <u>प्राध्यापक</u> या पदावरील व महाराष्ट्र शासकीय तंत्रनिकेतने शिक्षक सेवा या संवर्गातील <u>प्राचार्य</u> या पदावरील अधिका-यांमधून तर **सहाय्यक संचालक/उपसचिव** या पदावर महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा या संवर्गातील <u>सहयोगी प्राध्यापक</u> आणि महाराष्ट्र शासकीय तंत्रनिकेतने शिक्षक सेवा या संवर्गातील <u>विभाग प्रमुख</u> या पदावरील अधिका-यांमधून तर सहाय्यक सचिव (तां.)/निरीक्षक हया पदावर सहाय्यक प्राध्यापक, अभियांत्रिकी महाविद्यालय व अधिव्याख्याता, शासकीय तंत्रनिकेतने हया पदधारक अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने तदर्थ व्यवस्था करावयाचे विचाराधीन आहे. तेव्हा उपरोक्त पदावर काम करण्यासाठी इच्छूक असलेल्या अधिका-यांकडून पसंतीक्रम मागविण्यात येत आहेत. त्यामध्ये प्रतिनियुक्ती/बदलीसाठी पसंतीची (पदनामासह) तीन स्थळे दर्शविण्यात यावीत. तसेच सदर माहिती पाठविताना इच्छूक अधिका-याचे अर्जात खालील किमान माहितीचा अंतर्भाव असावा.

कृ. मा. प.

१. अधिका-याचे संपूर्ण नांव; २. जन्मतारीख; ३. पदनाम; ४.विद्याशाखा; ५. यापूर्वी प्रशासकीय स्वरुपाच्या पदावर काम केले असल्यास त्याचा तपशिल अथवा तशा स्वरुपाच्या पूर्वानुभवाचा तपशिल.

इच्छूक अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशी अथवा शिस्तभंगविषयक कारवाई प्रलंबित नाही व त्यांचे सचोटी व चारित्र्य संशयास्पद नाही याची खात्री विभागीय सहसंचालकांचे स्तरावर करण्यात यावी व त्याबाबतचे अभिप्राय विवरणपत्रावर नोंदविण्यात यावेत.

सदर पदावर तदर्थ व्यवस्थेने प्रतिनियुक्ती/बदलीसाठी खालील प्रमाणे किमान निकष विहित करण्यात येत आहेत.

१. इच्छूक अधिका-याची विद्यमान पदावर विद्यमान कार्यालयात किमान ०३ वर्षे सेवा झालेली असावी व तो बदलीपात्र असावा.
२. यापूर्वी शिक्षकीय संवर्गातील अधिका-यांनी प्रशासकीय स्वरुपाचे पदावर काम केले असल्यास पूर्वी प्रशासकीय पदावर ०५ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी काम केलेले नसावे व सदर पदावरुन कार्यमुक्त झाल्यापासून किमान ०३ वर्षे शिक्षकीय पदावर काम केलेले असावे.
३. सदर अधिकारी प्रशासकीय पदासाठीची आवश्यक अर्हता धारण करणारा असावा.
४. केवळ शासनामार्फत नियुक्तीने धारण केलेले नियमित विद्यमान पद विचारात घेऊन प्रतिनियुक्तीसाठी विचार केला जाईल, स्वायत्त संस्थांमधील व्यवस्थापन मंडळाकडील नियुक्तीचे पदनाम यासाठी विचारात घेतले जाणार नाही.

सदर पदी प्रतिनियुक्ती/बदलीसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र.टिईएम ३३९३/(५५३६)/टिई-१, दि. २२/११/१९९३ मध्ये नमूद केल्यानुसार दोन वर्षेपर्यंत तदर्थ व्यवस्थेचा कालावधी निश्चित केलेला आहे ही बाब संबंधीतांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

तेव्हा शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतने यामध्ये कार्यरत असलेल्या व उपरोक्त निकषांची पूर्तता करणा-या इच्छूक अधिका-यांनी आपले अर्ज उशीरात उशीरा दि. ६/४/२०१५ सायं.५.०० वा. पर्यंत संचालनालयाच्या desk1@dte.org.in वर ई-मेल द्वारे थेट पाठवावेत व त्याची एक प्रत विभागीय सहसंचालकांकडे द्यावी. अशा प्राप्त झालेल्या अर्जांची संकलीत माहिती प्रमाणित करुन सोबतच्या विवरणपत्रानुसार सहसंचालकांनी उशीरात उशीरा दि. ८/४/२०१५ सायं. ५.०० वा. पर्यंत उपरोक्त ई-मेल वर पाठवावी.

सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

( दयानंद मेश्राम )
सहसंचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य
मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता :
१. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतने.
४. माहिती तंत्रज्ञान, कार्यासन क्र.३, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

# विवरणपत्र

| अधिका-याचे नांव | विद्यमान पदनाम व विद्याशाखा व कार्यरत संस्था | वेतनश्रेणी, वेतनबँड व ग्रेड पे | विद्यमान पदावरील नियमित नियुक्ती दिनांक | जन्मतारीख | प्रतिनियुक्तीसाठी पसंतीक्रम | सध्याचे मुख्यालयात विद्यमान पदावरील कार्यकाळ | यापूर्वी प्रशासकीय पदावर काम केले असल्यास त्याचा कालावधी | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी (उपलब्ध असल्यास) | प्रशासकीय कामासाठी अध्यापकांची क्षमता व उपयुक्ततेच्या दृष्टीने सहसंचालकांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
| | | | | | १.<br>२.<br>३. | | | | |
| | | | | | १.<br>२.<br>३. | | | | |
| | | | | | १.<br>२.<br>३. | | | | |
| | | | | | १.<br>२.<br>३. | | | | |

उपरोक्त क्र.१ ते ९ मधील तपशीलाची पडताळणी करण्यात आली आहे.

सहसंचालकांची स्वाक्षरी